# २

# पवित्र शास्त्र, देवाचे वचन

पवित्र शास्त्र हे देवाच्या प्रेरणेने झाल्याचा दावा करते (२ तीमथ्य.३:१६,१७). ''देवाने प्रेरित केलेले'' असे ज्या मूळ ग्रीक वाक्प्रयोगाचे भाषांतर केले आहे, त्याचा शब्दशः अर्थ ''देवाने उच्छ्वसित (श्वास फुंकलेले) केलेले असा होतो. जगातील महान लेखकांना निरनिराळ्या कारणांनी प्रेरणा मिळते. यात तत्त्वे आणि घटना किंवा प्रसंगांचाही समावेश होतो. पण पवित्र शास्त्र ठामपणे सांगते की, खुद्द देवानेच त्याची प्रेरणा दिली. पेत्र, जो प्रेषित व नव्या करारातील अनेक पुस्तकांचा लेखक होता, त्याने लिहिले की, ''कारण संदेश मनुष्यांच्या इच्छेने कधी आलेला नाही; तर पवित्र आत्म्याने प्रेरित झालेल्या मनुष्यांनी देवापासून आलेला संदेश सांगितला आहे'' (२ पेत्र.१:२१).

या ईश्वरप्रेरित पुस्तकाशी तुमचा परिचय करून द्यावा हा या पाठाचा उद्देश आहे. पवित्र शास्त्राच्या दैवी उगमाविषयीचे काही पुराव्यांचा यात समावेश केला जाईल, परंतु या अद्‌भुत पुस्तकाविषयी तुमच्या मनात गोडी निर्माण करावी, ते वाचण्यासाठी तुम्हांला उत्तेजन द्यावे हा या पाठाचा मूळ उद्देश आहे. तुम्ही हे पवित्र शास्त्र वाचू लागाल व त्याचे पालन करू लागाल. (याकोब.१:२१-२५), तेव्हा या लक्षणीय पुस्तकाने युगायुगांपासून लोकांच्या मनावर इतका प्रभाव का टाकला आहे हे तुमच्या लक्षात येईल.

''अद्‌भुत वचनाची (देवाच्या) सात अद्‌भुत आश्चर्ये'' या पुस्तकाच्या लेखकाने पवित्र शास्त्राची प्राचीनता, आधुनिकता, विविधता, एकता, विषय, प्रभाव आणि सांत्वन ही जी वैशिष्ट्ये सांगितली आहेत त्यांचा ऊहापोह या प्रकरणात केला आहे. पवित्र शास्त्रातील इतर आश्चर्यांचासुद्धा उल्लेख करता येईल. उदा. त्याची ऐतिहासिक आणि भौगोलिक सत्यता, त्याचा निष्पक्षपातीपणा. पण स्तोत्रसंहितेच्या लेखकासोबत ''तुझे निर्बंध आश्चर्यकारक आहेत''. (स्तोत्र.११९:१२९), असे उद्‌गार काढायला ही सात आश्चर्ये पुरेशी आहेत.

# पवित्र शास्त्राची प्राचीनता

पवित्र शास्त्र हे संपूर्ण जगातील सर्वांत जुने पुस्तक आहे. साधारणपणे पुस्तकांना खूप जुने होण्याची संधी मिळत नाही. ती फारच नाजूक असतात. ती जाळली जातात, आणि पाणी त्यांना विरघळून टाकते. त्यांना कीड लागते आणि निष्काळजी बोटे त्यांना फाडून टाकतात.

संपूर्ण पवित्र शास्त्र जवळपास दोन हजार वर्षांपासून अस्तित्वात आहे. यातील काही पुस्तके याच्यापेक्षाही दुप्पट जुनी आहेत. जगातील कोणत्याही पुस्तकांसोबात त्याची तुलना करता येत नाही. पवित्र शास्त्राचा टिकाऊपणा आणि त्याचे अविनाशित्व त्याच्या वयावरून प्रकट होते.

उत्पत्ती, निर्गम, लेवीय, गणना आणि अनुवाद ही सर्वांत जुनी पुस्तके जुन्या करारात आहेत. या पुस्तकांचा लेखक मोशे होता आणि त्या पुस्तकांत मनुष्याची सुरुवात आणि मनुष्याचे सुरुवातीच्या दिवसांचे वर्णन केले आहे. हे निश्चित बोलता येते की आज मनुष्याजवळ हे पुस्तक अत्यंत प्राचीन काळापासून सर्व लेखांपासून मिळाले आहे.

पवित्र शास्त्र नष्ट करण्याचे निरंतर प्रयत्न मानवाने केले तरीदेखील ते आतापर्यंत टिकले आहे. कित्येक वेळा या पृथ्वीवर झालेल्या शक्तिशाली राज्यकर्त्यांनी या पुस्तकाचे अस्तित्व मिटवण्याचे प्रयत्न केले. ते वाचल्याबद्दल लोकांना ठार मारण्यात आले आणि खांबाला बांधून जाळून मारण्यात आले. त्याचा अभ्यास अभ्यास करणाऱ्या लोकांवर अत्याचार करून क्रुरतेच्या सर्व सीमा ओलांडल्या गेल्या, परंतु आजपर्यंत जगात लिहिल्या गेलेल्या इतर कोणत्याही पुस्तकापेक्षा पवित्र शास्त्राच्या अधिक प्रती आज जगात उपलब्ध आहेत.

तिसऱ्या शतकाच्या शेवटी रोमी सम्राट डायोक्लेशियन याने जाहीर केले की, ज्या कोणाही व्यक्तीजवळ पवित्र शास्त्राची प्रत मिळेल, त्याला मरणदंड दिला जाईल. एका कैद्याने ही आज्ञा मोडल्याची माहिती त्याच्या कुटुंबीयांनी शासनाला न दिल्याने सम्राटाने त्याच्या सर्व कुटुंबीयांचा वध केला. अशा प्रकारे या सम्राटाने त्याचे स्वतःचे पापी जीवन आणि अत्याचार यांना दोष देणारी पुस्तके नष्ट करण्याचा प्रयत्न केला. दोन वर्षांनंतर डायोक्लेशियनने मोठ्या गर्वाने म्हटले की, ''ख्रिस्ती लिखाण मी या पृथ्वीवरून पूर्णपणे नष्ट करून टाकले आहे.''

एका शतकानंतर रोमी सम्राट कॉन्स्टन्टाईन ख्रिस्तित्वाने प्रभावित झाला आणि आपल्या राज्यातील सर्व मंडळींसाठी नवीन कराराच्या प्रती तयार करून घ्याव्यात असे

त्याला वाटले. देवाच्या वचनाचा शोध घेऊन त्याची प्रत जो कोणी त्याच्या अधिकाऱ्याच्या हाती देईल त्याला भरघोस पारितोषिके देण्याची घोषणा त्याने केली. पवित्र शास्त्राच्या सर्व प्रती आपण नष्ट केल्या आहेत असे डायोक्लेशियनला वाटत होती, तरीदेखील चोवीस तासांच्या आत पवित्र शास्त्राच्या पन्नास प्रती रोमन सम्राटाला देण्यात आल्या.

जरी पवित्र शास्त्र हे नाशवंत सामुग्रीवर, शाईने लिहिले गेले होते तरी वेळोवेळी लूटपाट, प्राकृतिक शक्ती व मनुष्याची विनाशकारी कृती यांना तोंड देऊने पवित्र शास्त्र आजदेखील या शतकांत आपणाजवळ आहे. इतक्या जुन्या काळापासूनच्या इतिहासाचे श्रेय देवाच्या समायोजनालाच जात आहे.

## याची आधुनिकता

पवित्र शास्त्र इतके जुने असले तरी अनेक दृष्टीनी ते आधुनिक आहे. जुन्या पुस्तकांत आधुनिक शिक्षण मिळण्याची अपेक्षा आपण करत नाही. दहा वर्षांपूर्वीची विज्ञानाची पुस्तके कालबाह्य होतात, शंभरएक वर्षांपूर्वीच्या पुस्तकाविषयी जिज्ञासा वाटते. *साल्मन्स एंब्रियॉलॉजी* या इ. स. १७०० मध्ये छापलेली माहिती वाचून आजकालच्या डॉक्टरांची हसून हसून पुरेवाट होईल. इ. स. १६०० मध्ये छापलेले *फार्माकोपिया लंडेन्सिस* हे पुस्तक तर अजूनच हास्यास्पद वाटेल; त्या काळच्या या प्रसिद्ध पुस्तकानुसार जर कोणी डॉक्टर औषधोपचार करील तर वैद्यकीय व्यवसायावर नियंत्रण ठेवणारे अधिकारी त्याला तुरुंगात टाकतील.

अगदी काही वर्षांनंतरदेखील कसा फरक पडतो हे दाखवण्यासाठी, वनस्पती शास्त्रावर १५० वर्षांपूर्वी छापलेल्या पुस्तकातील एक विधान पुढे देत आहे :

> इटलीमध्ये एक वनस्पती उगवते... तिला स्वच्छ सुंदर पांढरी, दुर्मीळ प्रकारचा सुगंध असणारी फुले येतात. पण त्यात एक विचित्र प्रकारची शक्ती किंवा गुण आहे. ही फुले दमट, ओल्या दगडाखाली ठेवल्यावर दहा दिवसांनी त्यांचे रूपांतर विषारी विंचवात झाले. त्यांच्या दंशाने मृत्यू येतो.

कदाचित तुम्ही म्हणाल, "थोडे समजून घ्या. गेल्या दीड शतकात आपण खूप शिकलो आहोत. जुन्या पुस्तकांतून आधुनिक माहिती मिळण्याची अपेक्षा आपण करू शकत नाही." हाच तर मुद्दा आहे! उदा. मोशेने ३,५०० वर्षांपूर्वी लिहिले, तरी आजच्या आधुनिक विज्ञानाशी आणि ज्ञानाशी विसंगत असे काही त्यात आढळणार नाही. "विज्ञानाचे पूर्वज्ञान पवित्र शास्त्राला आहे" यानुसार ते लिहिले गेले आहे.

खगोलशास्त्रातल्या आणि वैज्ञानिक क्षेत्रातील आधुनिक माहिती पवित्र शास्त्रांच्या पानांमध्ये पाहायला मिळते. पुढील गोष्टींचा पवित्र शास्त्रात उल्लेख आहे:

पृथ्वी गोल आहे (यशया ४०:२२; नीति.८:२७).
पृथ्वी अंतरिक्षात निराधार टांगली आहे (ईयोब २६:७).
अंतरिक्ष इतके विशाल आहे की, त्याचे मोजमाप करता येत नाही अथवा
ताऱ्यांची गणती करता येत नाही (उत्पत्ती १५:५; यिर्मया ३३:२२).
समुद्रामध्ये नैसर्गिक प्रवाह किंवा मार्ग आहेत (जे आजतागायत
समुद्रप्रवासासाठी उपयोगात आणले जातात) (स्तोत्र.८:८).

पवित्र शास्त्र हे विज्ञानावरचे पुस्तक आहे असे ही विधाने सांगत नाहीत. उलट पवित्र शास्त्राचे लेखक जेव्हा विज्ञानाशी संबंधित एखाद्या गोष्टीचा ऊहापोह करतात तेव्हा त्यांच्या काळच्या इतर लेखकांप्रमाणे वैज्ञानिक वस्तुस्थितीशी विसंगत अशी विधाने करत नाहीत यावर ते जोर देतात.

पवित्र शास्त्राच्या कालातीत गुणवत्तेबाबतची फार सुंदर उदाहरणे वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित आहेत. आधुनिक आरोग्यशास्त्र आणि आरोग्यविषयक उपाय यांविषयी माहिती नसलेल्या काळात ते लिहिले गेले, तर जुन्या करारात मोशेला जे नियम सांगितले गेले, त्यात स्वच्छता, निर्जंतुकीकरण आणि रोगाला प्रतिबंध करणाऱ्या इतर पद्धती यांविषयीच्या पुष्कळ सूचना दिलेल्या आहेत.

उदा. ऑपरेशन करते वेळी डॉक्टरांनी तोंडाला मास्क लावणे ही सर्वमान्य पद्धत आहे. संसर्गजन्य रोग असलेल्या व्यक्तीच्या खोलीत जाताना तोंडाला मास्क लावला जातो. का? रोगजंतुचा संसर्ग होत नाही. शास्त्रज्ञांना रोगजंतूंचा शोध लागण्याच्या तीन हजार वर्षे अगोदर देवाने मोशेला ताकीद दिली होती की, ज्या महारोग्याच्या अंगावर हा चट्टा असेल त्याची वस्त्रे फाडलेली असावी त्याच्या डोक्याचे केस सोडलेले असावेत. त्याने आपला वरचा ओठ झाकून ठेवावा आणि अशुद्ध असे ओरडत राहावे (लेविय १३:४५). एक अत्यंत आधुनिक चिकित्सा म्हणजे रक्त चढवणे किंवा देणे होय. बऱ्याच वर्षांपूर्वी माणसांचे रक्त शरीराबाहेर काढणे किंवा जाऊ देणे, वैद्यकीय अभ्यासासाठी पूरक मानले जात असे. शरीरातील रक्त गेल्यामुळे कित्येक लोकांचे मृत्यू झाले, परंतु आज हे समजते की शरीरातील रक्त हे जीवनाचा उगम आहे. आता उत्पत्ती ९:४ मध्ये मोशेच्या म्हणण्याप्रमाणे ‘‘तथापि मांसाचे जीवन रक्त आहे म्हणून रक्तासकट मांस खाऊ नका’’ वेगळ्या शब्दांत मोशेचे म्हणणे होते की, शरीराचे जीवन रक्तातच असते (लेवीय १७:११-१४ मध्ये बघावे).

पवित्र शास्त्रातील वैद्यकीय ज्ञानाची यथार्थता कित्येक पुस्तकांमध्ये समर्पित केली आहे. त्यामध्ये वैद्यकीय ज्ञानाचे विशाल स्वरूपाला समाविष्ट केले आहे. खाली एक नमुना प्रस्तुत केला आहे.

माणूस व स्त्री या दोघांमध्ये जीवनाचे बीज आहे (उत्पत्ती ३:१५; २२:१८).
रोगी माणसाच्या किंवा जनावरांच्या संपर्कानंतर आपण स्वतःला व अंगावरील कपड्यांना दोषरहित करण्यातच समजदारी आहे (गणना १९:५-२२).
आपोआप किंवा स्वाभाविक मेलेल्या जनावरांचे मांस खाणे हानिकारक आहे (लेविय १७:१५).

हे आश्चर्यचकित करणारे नाही का? सर्वांत जुने पुस्तक आपल्याजवळ आहे, जे आजच्या एकविसाव्या शतकातील डॉक्टरांच्या विचारसरणीनुसार आधुनिक आहे.

पवित्र शास्त्राची आधुनिकता त्यामधील वेगवेगळ्या विषयांमधून दाखविता येईल काय? या पुस्तकात सांगितलेल्या नीतिमूल्यांपेक्षा अधिक प्रगती जगाने केली आहे असा दावा कोणी करू शकतो का? यातील आज्ञा, शिकवण कालबाह्य ठरवील असे उच्च प्रतीचे ज्ञान आपल्याला मिळाले आहे का? नाही! आधुनिक माणूस पवित्र शास्त्राची सुज्ञता बाजूला सारू लागलेला नाही. जग अजून हजार वर्षे टिकले तरी अगदी एकतिसाव्या शतकातदेखील पवित्र शास्त्र हे एकविसाव्या शतकाप्रमाणेच आधुनिक राहील!

## त्याची विविधता

पवित्र शास्त्र केवळ एकच पुस्तक असते, आणि त्यात केवळ एकाच विषयाचा ऊहापोह केला असता, तर आतापर्यंत आपण जे काही म्हटले तेच पुरेसे अद्भुत झाले असते. पण वस्तुस्थिती तशी नाही.

पवित्र शास्त्र हे जगातील सर्वांत वैविध्यपूर्ण पुस्तक आहे. एक तर ते दोन भागांत लिहिले आहे - जुना करार व नवीन करार. या दोन्ही करारांमध्ये सुमारे ४०० ते ५०० वर्षांचे अंतर आहे. दुसरी गोष्ट म्हणजे या दोन्ही भागांत अनेक पुस्तके - जुन्या करारात एकोणचाळीस आणि नवीन करारात सत्तावीस अशी एकूण सहासष्ट पुस्तके आहेत. तिसरी गोष्ट, ही सहासष्ट पुस्तके जवळपास चाळीस लेखकांनी लिहिली आहेत. चौथी गोष्ट म्हणजे हे चाळीस लेखक जवळपास दोन हजार वर्षांच्या काळात होऊन गेले. शेवटची गोष्ट म्हणजे या लेखकांनी साहित्याच्या प्रत्येक प्रकाराविषयी

लिहिले आहे, तसेच अजून एका विषयाबद्दल लिहिले आहे. आणि हा ''अजून एक'' विषय दुसऱ्या कोणत्याही पुस्तकात आढळत नाही. हा विषय म्हणजे खरा किंवा सत्य *भविष्यसंदेश*! हे केवळ देवाचे क्षेत्र आहे! पवित्र शास्त्रातील शेकडो भविष्ये जशीच्या तशी अगदी तंतोतंत पूर्ण झाली आहेत. जागेअभावी केवळ काही उदाहरणे देता येतील :

***राष्ट्रांसंबंधी भविष्यवाणी :*** इस्राएलचा उगम, पतन, आणि अनेक राष्ट्रांच्या पतनाबाबत बऱ्याच भविष्यवाणी केल्या गेल्या. उदाहरणार्थ अनु. २८:४७–६८ मध्ये इस्राएलाच्या इतिहासाचे स्पष्ट वर्णन केले गेले आहे. अश्शूरचा राजा (बघा यशया १०:१२, २४, २५; २ राजे १७:२८; २४; १८:१३) आणि बाबेल (बघा यशया १३; दानी ५:२८) यांच्यासहित इतर बऱ्याच राष्ट्रांबाबत भविष्यवाणी वर्तविल्या गेल्या.

***लोकांबाबत भविष्यवाण्या :*** पर्शियाचा राजा कोरेश याच्याविषयी सांगितले (यशया ४४:२८; ४५:१) तसे योशिया राजाच्या कार्याबद्दल त्याचा जन्माच्या तीनशे वर्षांपूर्वीच भविष्य सांगितले होते (१ राजे १३:२, २ राजे २३:१५, १६). अश्शुराचा राजा सन्हेरीब याची यरूशलेमेवरील कब्जा करण्याची असमर्थता याविषयीचा उल्लेख करणे उचित होईल (२ राजे १९:३२–३५ बघा).

***येशू ख्रिस्ताबाबत भविष्यवाणी :*** जुन्या करारातील जवळपास आठशे भविष्यवाणींपैकी तीनशेपेक्षा जास्त भविष्यवाणी येशू ख्रिस्ताविषयी आहेत. या पुस्तकातील ४ थ्या पाठामध्ये अनेक भविष्यवाणी व त्यांची पूर्तता यांची यादी दिली आहे.

पवित्र शास्त्र देवापासून आहे हे त्यातील विविधतेमुळे सिद्ध होते. विशेषत : ते यासाठी सत्य आहे की, या त्याच्या अनेकतेमध्ये एकता पाहावयास मिळते. या सर्वश्रेष्ठ पुस्तकामध्ये मानवी जीवन आणि आध्यात्मिकता यांच्या कोणत्याही पैलूकडे दुर्लक्ष केलेले नाही. ते मानवाच्या अस्तित्वाच्या सर्व बाजूंविषयी सैद्धान्तिक आणि दैवी मार्गदर्शनानुसार सांगते.

## त्याची एकता

पवित्र शास्त्र हे एकाच लेखकाने लिहिलेले एकच पुस्तक असते, तर त्याच्या सर्व भागांत सुसूत्रता, सारखेपणाची अपेक्षा आपण साहजिकच केली असती. तसेच एकाच

विषयावर चाळीस लेखकांनी एकच पुस्तक लिहिले असते तरी त्यात एकवाक्यता असण्याची शक्यता फारच कमी असती. म्हणून चाळीस व्यक्तींनी वेगवेगळ्या विषयांवर लिहिलेल्या सहासष्ट पुस्तकांत पूर्ण सहमती, एकवाक्यता आहे, त्यांतील शब्द परस्परांशी सुसंगत आहेत असा दावा ऐकून एकदम धक्का बसतो. ''एवढे लक्षणीय काम साध्य करण्यासाठी त्यांनी एकत्रितपणे मोठ्या काळजीपूर्वक काम केले असेल'' असे कोणी म्हणेल. पण वस्तुस्थिती निराळी आहे याला इतिहास साक्षी आहे. यांच्यापैकी कित्येकांनी एकमेकांना कधी बघितलेसुद्धा नाही. त्यांच्यामध्ये कित्येक शतकांचे अंतर होते, आणि केलेल्या कामाची उजळणी करण्याची संधी त्यांना मिळालीही नाही. मग या लिखाणामध्ये ही एकवाक्यता, सारखेपणा कसा आला असेल याविषयी वेगळ्या प्रकारे स्पष्टीकरण करणे आववश्यक ठरेल.

पवित्र शास्त्राच्या लेखकांमध्ये आणि त्यांच्या लिखाणामध्ये पूर्ण एकवाक्यता, सुसंगती आहे हे तथ्य नाकारता येत नाही. लोकांनी त्यामध्ये विसंगती शोधण्याचा प्रयत्न केला, परंतु ते असफल झाले. पवित्र शास्त्र हे एक आणि एकीकृत किंवा एकसूत्रित पुस्तक आहे.

उदाहरणार्थ, यातील दोन भाग, जुना करार व नवा करार यांवर विचार करूया. जरी ते वेगवेगळ्या लोकगटांसाठी केलेले दोन वेगळे करार असले तरी ते अतिशय सुंदर रीतीने एकमेकांशी जोडले गेले आहेत. कोणी तरी म्हटले आहे, ''जुन्या करारात नवीन करार लपलेला आहे आणि नवीन करारात जुना करार प्रकट होतो.'' जुना करार मूळ आहे व नवीन करार फळ आहे.

पवित्र शास्त्रातील पहिल्या व शेवटच्या पुस्तकातील काही तुलनात्मक गोष्टींवर विचार करू या :

१) उत्पत्तीची सुरुवात आकाश व पृथ्वीच्या प्रारंभापासून होते. प्रकटीकरणाची अखेर नवीन आकाश व नवीन पृथ्वीची निर्मिती यावर होते.

२) उत्पत्तीमध्ये प्रकाशाचे येणे आणि सूर्य व चंद्र यांची निर्मिती यांबद्दल सांगितले आहे, तर मानवासाठी असलेली त्यांची (सूर्य व चंद्र यांची) सेवा संपते याविषयी प्रकटीकरणामध्ये सांगितले आहे, कारण नवीन शहरात (स्वर्ग) देव आणि कोकरा (येशू) हे प्रकाश आहेत.

३) उत्पत्तीमध्ये मनुष्य सैतानाला भेटतो आणि हरतो. प्रकटीकरणात दुसरी लढाई होते; या वेळी सैतान हरतो आणि येशूच्या द्वारे मनुष्य विजयी होतो.

४) उत्पत्तीमध्ये, पहिला पुरुष आणि आणि स्त्री जेथे राहत होते, त्या एदेन बागेतून

मानवाला घालवून देण्यात आले. प्रकटीकरणामध्ये देवासोबत त्यांचा पुनःस्थापना होते.

५) शेवटी, मनुष्य जीवनाच्या झाडाचे फळ खाण्याची संधी कशी गमावतो, जेणेकरून पाप अविनाशी होऊ नये – हे उत्पत्ती आम्हांला सांगते. प्रकटीकरणात, पापाचा नाश झाल्यावर, माणसाने सर्वकाळ जगावे म्हणून त्याला जीवनाच्या झाडाचे फळ खाण्याचे आमंत्रण दिले जाते.

होय, या पुस्तकाची एकता अद्भुत आहे, त्याची एकता बघून, आपण आश्चर्यचकित होऊन जातो आणि निष्कर्ष काढतो की, त्याचा लेखक स्वतः परमेश्वर आहे.

## त्याचा विषय

पवित्र शास्त्रातील मजकूर संकलित करण्याच्या कामावर केवळ *एकाच व्यक्तीने* देखरेख केली तरच त्यातील एकवाक्यता, सुसंगती शक्य होईल. पवित्र शास्त्राचे हे लिखाण ज्या काळात झाले तेवढी म्हणजे १,५०० वर्षे कोणीही माणूस जगणे शक्य नाही, म्हणून केवळ देवालाच त्याचा लेखक म्हणणे सयुक्तिक ठरेल. ''... तर पवित्र आत्म्याने प्रेरित झालेल्या मनुष्यांनी देवापासून आलेला संदेश सांगितला आहे'' (२ पेत्र.१:२१) असे पेत्राने म्हटले तेव्हा त्याच्याही मनात हेच होते.

तसेच एकी, सुसंगती होण्यासाठी केवळ एक लेखक असणे पुरेसे नाही, तर विषयदेखील एक असला पाहिजे. यासाठी की, ते सगळे एकत्रित होऊ शकतील. या पुस्तकाचा उद्देश काय आहे? ''मानवप्राण्याची गोष्ट'' या विषयासाठी जरी मानवाने कारण दिले असले तरी या पुस्तकाचा विषय तो नाही. पुस्तकाचा विषय पुढे जाण्यासाठी यहूदी लोकांचा मोठा हातभार लागला हे जरी खरे असले तरी ही ''यहुदी लोकांची गोष्ट'' नाही. या पुस्तकाचा विषय ''एका मनुष्याची गोष्ट'' आहे आणि तो मनुष्य म्हणजे ''येशू ख्रिस्त आहे.''

पवित्र शास्त्र जो येणार त्याच्याभोवतीच फिरते असे म्हटले जाते, आणि ते योग्यच आहे. जुन्या कराराचा संदेश आहे, ''तो येत आहे.'' शुभवर्तमानांचा संदेश आहे की, ''तो येथे (आलेला) आहे'' आणि उर्वरित नवीन कराराचा संदेश आहे की, ''तो पुन्हा येणार आहे.''

पवित्र शास्त्रातील प्रत्येक पुस्तक येशू ख्रिस्ताला कशा प्रकारे सादर करते या दृष्टीकोनातून आपण त्यांचा अभ्यास केला, तर तो एक चांगला अभ्यास होईल. ''उत्पत्तीमध्ये येशू'', ''निर्गममध्ये येशू'', ''लेवियमध्ये येशू'' इ. पुष्कळ पुस्तके लिहिता येतील. उदा.

येशू उत्पत्ती १ मध्ये आहे, कारण सर्व काही त्याच्याद्वारे उत्पन्न झाले (योहान.१:३).

येशू उत्पत्ती ३ मध्ये आहे, कारण नंतर तिची (स्त्रीची) संतती जो होणार होता आणि जो सैतानाचे डोके ठेचणार होता तोच हा आहे (उत्पत्ती ३:१५; गलती.३:१६).

येशू उत्पत्ती ४ मध्ये आहे, येथे हाबेलाने अर्पण केलेले कोकरू हे त्याचे प्रतीक आहे (इब्री.१२:२४).

येशू उत्पत्ती ६ मध्येसुद्धा आहे, कारण तारणाद्वारे झालेली सुटका ही त्याच्याद्वारे आणि त्याच्यातून मिळणाऱ्या तारणाचे चिन्ह आहे. असा अधिकाधिक अभ्यास आपण करू शकतो.

अशा प्रकारे *येशू ख्रिस्त* या विषयामुळे देवाच्या वचनाला – पवित्र शास्त्राला अद्भुतरीत्या एकवाक्यता मिळते. जो येणार होता तो सोडवणारा; तारक, जो आला; आणि राजा – जो परत येईल तो येशू या सहासष्ट पुस्तकांतील शब्द एका एकसूत्रित अभिलेखात, पुस्तकात बांधतो.

## त्याचा प्रभाव

जगभरातील साऱ्या ग्रंथालयातील सर्व पुस्तकांपेक्षा मनुष्यजातीवर पवित्र शास्त्राचा प्रभाव सगळ्यात अधिक आहे, त्याने इतिहासाची दिशाच बदलवून टाकली. राज्ये उभारली, विजेते आणि राजे यांना खाली ओढले. त्यातील आज्ञांचे पालन ज्यांनी केले त्यांना त्याने यश आणि आशीर्वाद मिळवून दिले आणि जितक्यांनी त्याला विरोध केला त्यांना मृत्यू आणि नाश आणला. पवित्र शास्त्रामध्ये पुष्कळ निरनिराळी सामर्थ्ये आहेत, परंतु माणसांची जीवने बदलणे आणि त्यांना उंचावणे या त्याच्या सामर्थ्याकडे आपण विशेष लक्ष देऊ.

काही वर्षांपूर्वी अनेक द्वीपांच्या समूहामध्ये एक क्रूर जमात राहत होती. उघडेनागडे राहणारे हे जंगली, रानटी लोक ठार मारलेल्या शत्रूचे रक्त रिकाम्या कवटीतून पिऊन कसा आंनदोत्सव करीत हे दाखवणारी चित्रे ज्युलियस सीझरच्या सैन्याच्या युद्धविषयक वृत्तान्तात आहेत. द्रुईड लोकांच्या वेद्यांवर माणसांचा बळी देणे ही सर्वसामान्य गोष्ट होती. पण मग काही तरी घडले! मिशनरी लोकांनी आपले जीव धोक्यात घालून देवाचे वचन त्यांना सांगितले. आणि त्यांनी ते स्वीकारले. काही वर्षांनंतर अलेक्झांडरच्या राज्यापेक्षा मोठे साम्राज्य त्यांनी उभारले, कारण हा द्वीपसमूह ब्रिटिश द्वीपसमूह होता.

जेथे पवित्र शास्त्र पोहचले तेथे मनुष्यजातीचा उद्धार झाला. पवित्र शास्त्र स्वतःच परिवर्तित जीवनाच्या गोष्टींनी पूर्ण आहे. बेईमान कर घेणारा इमानदार आणि झाला

(लूक.१९:१-९) खून करणारा, देवाची निंदा करणारा माणूस प्रेषित झाला (प्रे. कृ. ७:५८; ८:१,३; २२:४-२१). दुसरी पण काही उदाहरणे दिली आहेत.

परमेश्वराने पवित्र शास्त्राच्या शक्तीद्वारे जे दुसऱ्यांसाठी केले आहे, ते तो तुमच्याही जीवनात करू शकतो. जर तुम्ही त्याचे वचन (पवित्र शास्त्र) वाचाल आणि त्यानुसार आचरण कराल तर तो तुम्हांला त्याचा पुत्र येशू ख्रिस्त याच्या रूपात बदलील.

## त्याचे सांत्वन

दुसऱ्या क्षेत्रांप्रमाणेच, मनुष्याची सेवा, सांत्वन करण्यात पवित्र शास्त्र अद्वितीय अद्भुत व अनुपम आहे. मरणानंतरच्या जीवनाकडे पाहण्यासाठी मानवाला मदत करील असा विश्वसनीय प्रकाश कधी झाला नाही, किंवा होणार नाही. पवित्र शास्त्र त्याच्या वाचकांना सार्वकालिक जीवनाची आशा आणि भरवसा देते. आणि प्रिय व्यक्तीचा मृत्यू झाल्यावर ते जिवाला सांत्वन देते.

मृत्यू आपला शत्रू आहे. माणसाचे सर्व काव्य आणि तत्त्वज्ञान ही गंभीर वस्तुस्थिती बदलू शकत नाही. पण ख्रिस्ती विश्वासणाऱ्यासाठी मात्र तो (मृत्यू) पूर्वीच पराभूत झालेला शत्रू आहे. उद्धार पावलेल्या लोकांना देवाच्या सान्निध्यात नेण्याची सेवा मृत्यूला ख्रिस्ताच्या सामर्थ्याने नाईलाजाने करावी लागते. पण शेवटी मृत्यू हा *शत्रूच* आहे! हा शत्रू राजवाड्यांमध्ये प्रवेश करू शकतो, तसाच झोपड्यांमध्येही प्रवेश करू शकतो. तो पतीला पत्नीपासून दूर करू शकतो. तो लहान बाळांना आईच्या कुशीतून हिसकावून घेऊ शकतो. तो आनंदाचे रूपांतर दुःखात करून टाकतो.

एखादी प्रिय व्यक्ती मरण पावते तेव्हा लोक विनंती करतील, ''आमचे सांत्वन करतील असे शब्द आमच्याशी बोला.'' हे शब्द कोठून येतील? साहित्यातून? कवीकडून? एखाद्या तत्त्वज्ञाकडून? तुमची सगळी पुस्तके चाळून पाहा. तुमच्या घरावर मृत्यूने प्रहार केल्यावर तुम्हांला पूर्ण सांत्वन आणि आशा देईल अशी एकही ओळ कोणा मर्त्य मानवाने लिहिल्याचे तुम्हांला आढळणार नाही. सांत्वन आणि शक्ती देणारे शब्द केवळ एकच पुस्तक देऊ शकते, आणि ते म्हणजे पवित्र शास्त्र. देवाच्या या पुस्तकामध्ये आपण पुढीलप्रमाणे अनेक वचने वाचू शकता :

> मृत्यूच्छायेच्या दरीतूनही मी जात असलो तरी अरिष्टांस भिणार नाही. कारण तू मजबरोबर आहेस, तुझी आकडी व तुझी काठी मला धीर देतात (स्तोत्र २३:४).
>
> तरी पण ख्रिस्त महानिद्रा घेतलेल्यांमध्ये प्रथम फळ असा मेलेल्यांतून

उठविला गेला आहे.

... हे जे विनाशी त्याने अविनाशीपण परिधान केले, तेव्हा मरण विजयात ग्रासिले गेले आहे, असा जो शास्त्रलेख तो पूर्ण होईल (१ करिंथ.१५:२०-५४).

मग जिवंत उरलेले आपण त्यांजबरोबर प्रभुला सामोरे होण्यासाठी मेघारूढ असे अंतराळात घेतले जाऊ, आणि तसेच सर्वदा प्रभुजवळ राहू, यास्तव या वचनांनी एकमेकांचे समाधान करा (१ थेस्सल.४:१७,१८).

तो त्यांच्या डोळ्यांचे सर्व अश्रू पुसून टाकील; यापुढे मरण नाही, शोक, रडणे व कष्ट हे नाहीत, कारण पहिल्या गोष्टी होऊन गेल्या (प्रकटी.२१:४).

वर्षानुवर्षे या शब्दांनी आणि पवित्र शास्त्रातील यांसारख्या इतर शब्दांनी लाखो, करोडो लोकांचे अश्रू पुसले आहेत, त्यांना आशा दिली आहे. खरोखर हे एक अद्भुत पुस्तक आहे!

## सारांश

आपण पवित्र शास्त्राच्या सात आश्चर्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. ते जुने असले तरी ते नेहमीच नवीन आहे! ते विविधतेने भरलेले आहे, तरी त्यात एकसंधता, एकवाक्यता आहे - ही एकता येशूमध्ये केंद्रित झालेली आहे. त्याचा प्रभाव फारच शक्तिशाली आहे, पण सांत्वन देण्यासाठी ते अतिशय मृदू, हळुवार आहे! पवित्र शास्त्र हे पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने दिलेले देवाचे वचन आहे, यापेक्षा अधिक चांगले स्पष्टीकरण देता येणार नाही.

## अभ्यासासाठी प्रश्न

*(उत्तरे पृष्ठ 228 वर आहेत)*

१. २ तीमथ्य.३:१६ मधील "ईश्वरप्रेरित" या शब्दांचा अर्थ काय होतो?

२. रोमन सम्राट डायोक्लेशियन याने पवित्र शास्त्र व त्यातील संदेश नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यात त्याला यश आले का?

३. लेविय १३:४५ हे वचन पवित्र शास्त्राची समर्पकता कशा प्रकारे दाखवते?

४. पवित्र शास्त्र हे देवापासून आहे हे त्यातील फरकांमुळे कसे सिद्ध होते?

५. पवित्र शास्त्राचा विषय काय आहे?

६. जगातील सर्व ग्रंथालयातील सर्व लिखाणांपैकी कोणत्या पुस्तकाने जगावर

सर्वांत जास्त प्रभाव टाकला आहे?

७. पवित्र शास्त्र आपल्या वाचकांना कोणते सांत्वन देऊ करते?
८. पवित्र शास्त्र हे देवाच्या प्रेरणेने लिहिले गेलेले पुस्तक आहे हे सिद्ध करणारी पवित्र शास्त्राची सात आश्चर्ये लिहा.